दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.२४ एप्रिल २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २३५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 24 April 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 235 ● Pages 4 ● Rate 4 Rs


### सुनेत्रा पवार अन् अक्षय कर्डिलेंचा विजय निश्चित

**मुंबई**–निवडणूक आयोगावर कोणत्याही पक्षाचा झेंडा नाही, पण उबाठा गटाच्या कार्यालयावर काँग्रेसचा झेंडा दिसून येत आहे. उबाठा काँग्रेसची चाकरी करत आहे, त्यांची गुलामी करत आहे. उबाठा गटाच्या शिल्लक कार्यालयावर काँग्रेस झेंडा आणि तिथून काँग्रेस विचार पसरवण्याचे काम सुरू आहे, हेच उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांचे धोरण झाले आहे, असे भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी म्हटले आहे.नवनाथ बन म्हणाले की, बारामती आणि राहुरीमध्ये महायुतीचे दोन्ही उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून येतील, जनता महायुतीसोबत आहे. अजित पवार यांच्या अपघातानंतर पोटनिवडणूक घेण्याची वेळ आली आहे. बारामतीकर हे सुनेत्रा पवार यांच्या पाठिशी आहेत. तिथे मविआने जे सहकार्य केले आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. राहुरीमध्ये जनता महायुतीच्या बाजून आहे तिथे अक्षय कर्डिले यांचा विजय निश्चित आहे.नवनाथ बन म्हणाले की, बारामतीमध्ये पवार विरुद्ध पवार सामना व्हावा ही रोहित पवार यांची इच्छा आहे.

# उद्धव ठाकरेंनीच विधानपरिषदेची निवडणूक लढवावी:खासदार सुप्रिया सुळेंचे आग्रही ट्विट


### उद्धवजींनी या मागणीचा सकारात्मक विचार करावा– सुप्रिया सुळे

सुप्रिया सुळे यांनी ट्विट करत म्हटले की, महाराष्ट्रात विधानपरिषदेची निवडणूक होऊ घातलेली आहे. ही निवडणूक राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनीच लढावी अशी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची आग्रहाची विनंती आहे. उद्धवजी हे राज्यातील ज्येष्ठ व अनुभवी नेते आहेत. त्यांच्या अनुभवाचा राज्याला तसेच सभागृहाला सदैव फायदाच होत राहील, असा आम्हा सर्वांना विश्वास आहे. उद्धवजींनी या मागणीचा सकारात्मक विचार करावा ही नम्र विनंती, असे म्हटले आहे.



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील विधानपरिषदेच्या १० जागांसाठी निवडणुका जाहीर झाल्या असून शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा कार्यकाळ संपल्याने रिक्त झालेल्या जागेवर कोणाची वर्णी लागणार, याची मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या जागेसाठी महाविकास आघाडीतून काँग्रेसने आधीच अनुकूलता दर्शवली असताना, आता खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्विट करत उद्धव ठाकरेंनीच पुन्हा निवडणूक लढवावी, अशी विनंती केल्याने शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही त्यांच्याच नावाला पसंती दिल्याचे स्पष्ट झाले आहे. विधानपरिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतील मित्रपक्षांनी उद्धव ठाकरे यांनीच पुन्हा निवडणूक लढवावी यासाठी आग्रह धरला असून, काँग्रेसचे हर्षवर्धन सपकाळ यांनी 'मातोश्री'वर जाऊन तर विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडियाद्वारे ही भूमिका स्पष्ट केली आहे. त्यातच आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही ट्विटद्वारे ठाकरेंना निवडणूक लढवण्याची विनंती केल्याने, संपूर्ण आघाडीचा त्यांनाच पाठिंबा असल्याचे स्पष्ट होत असून आता उद्धव ठाकरे स्वतः काय निर्णय घेतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



### उद्धवजी ठाकरे लढणार असतील तर त्याचे स्वागत विजय वडेट्टीवार

**काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी ट्विट करत म्हटले की, महाराष्ट्रात विधानपरिषदेची निवडणूक होणार आहे. या जागेवर माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे लढणार असतील तर त्याचे स्वागत असेल. पण ते जर निवडणूक लढणार नसतील तर मग महाविकास आघाडीचा उमेदवार कोण असेल याबाबत चर्चा करावी लागेल. कारण त्यानंतर येणाऱ्या राज्यसभेच्या जागी कोणत्या पक्षाचा उमेदवार असेल याबाबत ही आताच स्पष्टता करावी लागेल. महाविकास आघाडी एकसंध राहण्यासाठी तिन्ही पक्षाच्या समन्वयाने निर्णय घ्यावे लागतील. मीडियाच्या माध्यमातून याबाबत चर्चा घडवून आणणे उचित नाही, असे मत वडेट्टीवार यांनी व्यक्त केले आहे.**

# विभागीय आयुक्तांकडून महाराष्ट्र दिन पूर्वतयारीचा आढावा

दैनिक वादळ वार्ता
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनानिमित्त दि. १ मे रोजी देवगिरी मैदान, पोलीस आयुक्त कार्यालय येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज पूर्वतयारीचा आढावा घेत संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या.




विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कामकाज करावे व सोपविलेल्या जबाबदाऱ्या वेळेत व प्रभावीपणे पूर्ण कराव्यात, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले.

बैठकीच्या प्रारंभी अपर आयुक्त मंजुषा मिसकर यांनी विभागनिहाय जबाबदाऱ्यांचा आढावा सादर केला. यामध्ये ध्वजारोहण सोहळ्याचे नियोजन, सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियंत्रण, स्वच्छता व पायाभूत सुविधा यांसंदर्भातील तयारीचा आढावा घेण्यात आला.महसूल विभाग, पोलीस आयुक्त कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगरपालिका, प्रादेशिक परिवहन विभाग यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसंदर्भात सर्व विभागांनी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ पूर्ण करून कार्यक्रम सुरळीत व यशस्वीरीत्या पार पाडावा, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

# पाणीपुरवठा योजना विकासकामांना गती द्या

### दिशा समितीच्या मॅरोथॉन बैठकीत खा.सोनवणेंनी तब्बल २७ विभागाचा घेतला आढावा

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या कोट्यवधींच्या निधीतून राबवल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ सामान्यांपर्यंत पोहोचवताना यंत्रणा सुस्त असू नयेत, जलजीवन मिशन योजना राबवूनही गावे तहाणलेली आहेत. रस्त्याची अवस्था वाईटच आहे, मार्च २०२६ संपला तरी अनेक योजनांचे लक्ष्य का झाले नाही अशा प्रश्नांचा खुलासाखा.बजरंग सोनवणे यांनी गुरुवारी मागितला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती' (दिशा) बैठकीत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर समितीचे सचिव तथा जल्हिाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील, निवासी उपजल्हिाधिकारी शिवकुमार स्वामी, मोहन जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. दिशा समितीच्या बैठकीत रस्ते व पाणीपुरवठा कामांवर सर्वाधिक चर्चा करण्यात आली.

यावेळी खा.बजरंग सोनवणे म्हणाले, जलजीवन मिशन आणि पेयजल व स्वच्छता विभागाच्या कामांमध्ये भ्रष्टाचाराच्या तक्रारी येत असून, अनेक ठिकाणी नळ योजना केवळ कागदावरच आहेत. रस्ते खोदून ठेवले आहेत पण पाणी मिळत नाही, यावर त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाच्या कामांच्या दर्जाबाबत त्यांनी अभियंत्यांना कारणे विचारली.



# दिव्यांगांचे पैसे मिळाले नाहीत म्हणून शेतमजूर युनियनचे तहशीलवर भव्य निदर्शने



दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

दिव्यांग लाभार्थ्यांना माहे मार्च महिन्याचे एप्रिल महिना संपत आला तरी अद्याप अनुदान मिळाले नाही ते तत्काळ वाटप करणे बाबत या मागणी साठी आज २३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वा तहसील कार्यालय माजलगाव समोर महाराष्ट्र शेतमजूर व इतर ग्रामीण मजूर युनियनच्या वतीने भव्य निदर्शने आंदोलन करण्यात आले, यामध्ये दिव्यांग लाभार्थ्यांना माहे मार्च - एप्रिल २०२६ चे अनुदान मिळाले नाही ते तात्काळ वाटप करा दिव्यांग मधील काही लाभार्थ्यांना १५०० रू. अनुदान मिळत आहे त्या लाभार्थ्यांना २५०० रु. वाटप करा, श्रावणबाळ व सांगायोगाच्या लाभार्थ्यांना दिव्यांगाप्रमाणे २५०० रू. अनुदान वाटप करा. श्रावणबाळ व सांगायोगाच्या लाभार्थ्यांना नवीन अर्ज मंजुरीसाठी उत्पन्न मर्यादा रू. २५०००० रू करा या मागण्यासाठी निदर्शनात बहू संख्येने शेतमजूर, कॉ. रत्नाकर गोळेकर, सचिव, उषा अवशे, सय्यद रत्जाक, शिवाजी कुरे, मोहन जाधव, कृष्णा सोळंके, विजय राठोड, अबई काळे, दादासाहेब राठोड, सय्यद सिराज, आश्रुबा गाढवे, शेख शमीम, सूवर्णमाला बडे, गोरख गोरे व प्रातिनिधिक स्वरूपात आज सर्व दिव्यांग, निराधार लाभार्थी या निदर्शनात सहभागी होते, जर हे अनुदान वेळेत मिळाले नाही तर मोठे आंदोलन केले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

# अक्कलकुवा तालुक्यात प्रशासकीय दिरंगाईचा फटका;रेशनकार्डच्या कामासाठी महिनोन्महिने फेऱ्या

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी । मोलगी**

'शासन आपल्या दारी' अशा घोषणांचा सर्वत्र गाजावाजा होत असताना, दुर्गम अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी बांधवांना मात्र एका साध्या रेशनकार्डसाठी तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. रेशनकार्डवर नाव चढवणे असो वा कमी करणे, तांत्रिक कामांच्या नावाखाली 'आयडी'च्या चक्रव्यूहात सर्वसामान्य नागरिकांना अडकवून ठेवले जात आहे. डोंगराळ भागातून पदरमोड करून येणाऱ्या गरिबांच्या या 'फेऱ्या' थांबणार कधी, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.




तालुक्यातील पुरवठा विभागाचा कारभार सध्या कमालीचा संशयास्पद आणि ढेपाळलेला दिसत आहे. नवीन रेशनकार्ड किंवा दुरुस्तीसाठी गेलेल्या नागरिकांना कंत्राटी कामगार आणि अधिकारी यांच्याकडून मिळणारी उत्तरे धक्कादायक आहेत. एका आयडीत काम झाले, पण दुसऱ्यात पेंडिंग आहे किंवा साहेबांच्या आयडीला मंजुरी मिळणे बाकी आहे, अशा तांत्रिक सबबी सांगून नागरिकांना महिनोन्महिने झुलवत ठेवले जात आहे. वास्तविक, सरकारने या प्रत्येक कामासाठी सेवा हमी कायद्यांतर्गत ठराविक कालावधी निश्चित केला आहे. मात्र, अक्कलकुव्यात या कायद्याची पायमल्ली होताना दिसत आहे.

अक्कलकुवा तालुक्याचा मोठा भाग हा दऱ्याखोऱ्यांचा आणि दुर्गम आहे. होराफळी,मोरांबा,कुवा अशा अतिदुर्गम भागातून येणाऱ्या नागरिकांना तहसील कार्यालयात पोहोचण्यासाठी मोठा प्रवास करावा लागतो. हातावर पोट असलेल्या या आदिवासी बांधवांचा एक दिवसाचा रोजगार बुडतो, शिवाय प्रवासाचा खर्च वेगळाच. पदरात काहीच न पडता रिकाम्या हाताने परत जावे लागल्याने त्यांच्या खिशाला मोठी कात्री लागत आहे. प्रशासनातील ही उदासीनता केवळ कामात विलंब करत नसून, अप्रत्यक्षपणे गरिबांचे शोषण करत आहे. रेशनकार्ड नवीन असो किंवा दुरुस्तीसाठी शासनाने निश्चित केलेली मुदत असतानाही, येथे मात्र 'तारीख पे तारीख' सुरू आहे.अनेकदा कर्मचारी नागरिकांना टाळण्याचा प्रयत्न करतात.रेशनकार्ड हा केवळ कागदाचा तुकडा नसून, गरिबांच्या जगण्याचा आधार आहे. स्वस्त धान्य दुकानातून मिळणारे अन्न धान्य याच कार्डावर अवलंबून असते. प्रशासनाने तांत्रिक त्रुटींचे कारण पुढे करण्याऐवजी, प्रलंबित अर्जांचा निपटारा करण्यासाठी विशेष मोहीम राबवणे गरजेचे आहे. वरिष्ठांनी याकडे तातडीने लक्ष देऊन उपाययोजना करणे आवश्यक आहे, अन्यथा संतापलेल्या जनतेचा उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही.

# संपादकीय

## दशकानंतरचं जग

माणसाला सर्वात हवीशी वाटणारी आणि अत्यावश्यक असलेली एक बाब नाहीशी होण्याच्या मार्गावर आहे. ती म्हणजे व्यक्तिगत गुप्तता उर्फ 'प्रायव्हसी'! तसे पाहिले तर ती आताच हाताबाहेर जात आहे. दुकानांमध्ये, रस्त्यावर कॅमेरे असतातच. शिवाय संगणकांमध्ये, हँडसेटमध्ये, गाडीमध्ये 'जीपीएस' असते. पण स्मृतिभ्रंशासारख्या रोगांचे प्रमाणदेखील वाढत असल्याने आपले काय हरवले आहे, तेच बहुधा आपण विसरून जाऊ!माझ्याकडे १८८० मधले एक दुर्मीळ पुस्तक आहे!' एखादा संग्राहक अभिमानाने सांगतो. आपल्यालाही त्याचे कौतुक वाटते, कारण इतकी जुनी वस्तू त्याने जीवापाड जपलेली असते आणि पुढच्या पिढ्यांना ऐतिहासिक संदर्भ म्हणून तिचा (कदाचित) उपयोग होणार असतो... 'कदाचित' असे म्हटले कारण चक्रावणाऱ्या वेगाने तांत्रिक प्रगती होण्याच्या या दिवसांमध्ये बदलती जीवनशैली आणि संकल्पनांमध्ये कोण जाणे किती व्यक्तींना अशा संग्राहकांचे आणि त्यांच्याकडे असलेल्या वस्तूंचे महत्त्व वाटेल! हे झाले वस्तूंचे उदाहरण. तंत्रज्ञानातील बदलांसोबत संबंधित उपकरणांचे दृश्य रूप आणि कार्यपद्धतीदेखील किती आणि कशी बदलते पाहा. तसेच होणारे सर्वच बदल चांगलेच असतील असेही नाही; परंतु त्या दिशेने प्रवास सुरू आहे हे नक्की!२०३५ पर्यंतच्या अत्याधुनिक काळात सर्वात आधी बळी पडणार आहे टपाल आणि तार खात्याचा म्हणजेच पोस्टाचा. गंमत पाहा, फक्त दहा–पंधरा वर्षांपूर्वी हे विधान अतिशयोक्तीपूर्ण वाटले असते. कारण शहरी भाग वगळला तरी खेड्यापाड्यांमधील लोक तोपर्यंत संवादाच्या विविध माध्यमांसाठी पोस्टावर अवलंबून असत; परंतु मोबाइल फोनच्या क्रांतीने हे भाकीत पार उलटे करून टाकले. शिवाय येणारा जमाना तत्काळ उर्फ 'इंस्टंट'चा आहे. मोबाइल फोन, संगणक, इंटरनेटच्या वापराने लगेचच संभाषण आणि संदेशवहन होत असताना उशिराने मिळणाऱ्या टपालसेवेवर कोण अवलंबून राहील? तसेच तंत्रज्ञानाबरोबरच खासगी कुरियर सेवेने टपाल खात्याचा महसूल बऱ्यापैकी खाल्ला आहे. ही सेवा चालवणे सरकारला दिवसागणिक न परवडणारे होत चालले आहे, हे तर आपण पाहतोच आहोत. खरे तर, हळूहळू का होईना, पोस्ट ऑफिसचे रूपांतर बँकेमध्ये होऊ लागले आहे. बँकेवरून आठवले, चेकदेखील पोस्टाच्याच वाटेने जात आहे, हे वाचून बहुतेकांना आश्चर्य वाटेल; पण ते खरे आहे. चेकवरील प्रशासकीय प्रक्रिया करण्यामागचा खर्च अनेक बँका आणि वित्तसंस्थांना दिवसेंदिवस न पेलवणारा होत आहे. खुद्द ग्रेट ब्रिटनमध्ये २०२८ पर्यंत धनादेशाला त्याच्या सिंहासनावरून पायउतार करण्याबाबतची योजना कार्यान्वित झाली आहे. 'प्लास्टिक मनी' म्हणजेच विविध क्रेडिट–डेबिट–प्रीपेड कार्डे, फोन बँकिंग आणि इंटरनेट याद्वारे होणाऱ्या आर्थिक व्यवहारांची संख्या जगभर विलक्षण वेगाने वाढत असल्याचाही हा परिणाम आहे.या यादीमध्ये पुढचे नाव आहे वृत्तपत्रांचे. वाचक म्हणतील आता हे फारच झाले, आपल्याकडे असे होणे शक्यच नाही. शिवाय गरम चहाचे घुटके घेत पेपर वाचण्याची मजा कोण सोडेल? हे घडून येण्यासाठी कदाचित जरा वेळ लागेल (भारतामध्ये २०३५ पर्यंत वृत्तपत्रांचा खप उतरणीला लागलेला असेल असा काहीजणांचा अंदाज आहे.) पण जागतिक पातळीवरचा कल तसा आहे खरा. जगभरातील अनेक युवक–युवतींनी दररोजचे वृत्तपत्र विकत घेणे बंद केले आहे. (अर्थात आपल्याकडच्या तुलनेने बाहेरच्या देशांमध्ये वृत्तपत्रे खूपच महाग असतात हेदेखील तितकेच खरे.) त्यांचे म्हणणे बातम्या काय, इंटरनेट, रेडिओ किंवा मोबाइल फोनवर मिळतातच. शिवाय वृत्तपत्रांच्या मालकांनीही हे वारे ओळखून ई–आवृत्त्या सुरू केल्या आहेतच. त्यावर जास्त तत्परतेने ताज्या बातम्या कळण्याची शक्यता असल्याने त्या लोकप्रिय होत आहेत. छापील वृत्तपत्रांकडून आपला विषय पुस्तकांकडे जाणे नैसर्गिक आणि अपरिहार्य आहे, नाही का? वैयक्तिक तसेच सार्वजनिक पातळीवरचे छापील पुस्तकांचे साम्राज्य प्रचंड असले तरी त्याला दोन अंगभूत मर्यादा आहेत. पुस्तकांचे वजन आणि त्यांना लागणारी जागा. शिवाय देखभाल आहेच. दोन–तीन हजार पुस्तके सहज घरी बाळगणाऱ्या खऱ्या पुस्तकप्रेमींना या अडचणींचा चांगलाच अनुभव असतो. तसेच नव्या पिढीचे वाचन एकंदरीतच कमी झाले आहे, असेही दिसते. त्यामागची कारणे काहीही असोत.बरे, आजकाल पुस्तके ऑनलाइन खरेदी करता येतात. 'अमेझॉन'वर मिळणाऱ्या 'किंडल' सारख्या इलेक्ट्रॉनिक साधनामध्ये हजारो पुस्तके मावतात. अशी साधने स्वतःच्या बॅटरीवर सात–आठ दिवसदेखील चालतात. कुठेही बसून कितीही वाचा! बोटांना पाने उलटण्याऐवजी 'पेज डाउन'चे बटन दाबण्याची सवय लागली की झाले! दूरध्वनीच्या लँडलाइन जोडणीबाबत मात्र कोणाचे दुमत असेल, असे वाटत नाही. जगात तर सोडाच, भारतातदेखील अनेक कुटुंबांमध्ये मुले लहान असल्याने अशांनी लँडलाइन जवळजवळ नाइलाजानेच सांभाळली आहे. काहींनी तर कित्येक वर्षांची दोन पिढ्यांची सवय आहे म्हणूनच बहुधा लँडलाइन ठेवली असावी. मोबाइल फोनच्या सेवेतील तांत्रिक प्रगती, 'नंबर पोर्टेबिलिटी' अशा सुविधांमुळे लँडलाइनचे अस्तित्वच धोक्यात येणार हे उघड दिसते आहे.संगीत अर्थातच नष्ट होणार नाही; परंतु त्याच्या उपलब्धतेचे मार्ग आणि पद्धती बदलतील. खरे तर संगीत उद्योगातील फायदा दिवसेंदिवस कमी होत आहे. पायरसी उर्फ अनधिकृत वापर आणि वितरण, हे त्यामागील एक मोठे कारण आहेच; परंतु (जरा वादाचा मुद्दा असलेली) आणखी एक गंभीर बाबदेखील यात समाविष्ट आहे. संगीतातील सर्जनशीलता, उत्स्फूर्तता आणि नवनिर्मिती कमी होत आहे. सध्याच्या 'रीमिक्स'च्या संख्येवरून हे सहज समजून येईल. शिवाय फाइल शेअरिंग आणि सुलभ डाउनलोडिंगच्या तंत्रामुळे 'सीडी'च्या जमान्यात भरपूर व्यवसाय करणारा संगीतउद्योग, आता आर्थिकदृष्ट्या मेटाकुटीला आला आहे.इंटरनेटमार्फत मिळणाऱ्या सुविधा आणि त्यांचा प्रसार अनंत असल्याने रेकॉर्ड्स, कॅसेट आणि सीडी असा प्रवास करून आलेला संगीत उद्योग– त्याने स्वतःचीच भविष्यकालीन धोरणे तपासून न पाहिल्याने सध्या तरी जरा गोंधळलेल्या अवस्थेत आहे. याबाबत 'रोलिंग स्टोन्स' या जगप्रसिद्ध वाद्यवृंदाशी संबंधित असलेल्या स्टीव्ह नॉपरने एक पुस्तकही लिहिले आहे. आपल्याकडे दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्या, डीटीएच आदींचे प्रस्थ सध्या वाढत असले तरी जागतिक पातळीवर पारंपरिक अर्थाने टीव्ही पाहणे कमी होत आहे. याची कारणे दोन. एक तर 'लाइव्ह स्ट्रीमिंग' सारख्या तंत्रांमुळे संगणकावर तसेच सेलफोनमार्फत थेट टीव्ही उपलब्ध होण्याचे प्रमाण आणि वेग वाढतो आहे. तसेच कॉम्प्युटर गेम्ससारखे करमणुकीचे इतर प्रकारही संगणकावर मिळत असल्याने त्यापासून दूर जाऊन वेगळे माध्यम वापरण्याची गरज कमी होत आहे. 'नेटफ्लिक्स'सारख्या सुविधेमुळे प्रेक्षकाला काय पाहावे, याबाबतचे निर्णयस्वातंत्र्य मिळू लागले आहे. शिवाय टीव्हीवरील वाढत्या जाहिरातींमुळे मूळ कार्यक्रमाचा एकंदर कालावधी वाढत चालला आहे. बरे, जाहिराती न दाखवण्याने वाहिन्यांची पंचाईत होते. कारण प्रक्षेपणाचा वाढता खर्च. असे हे दुष्टचक्र किती काळ नीट चालते ते पहायचे!आता आपल्या ध्यानात आले असेल, की भविष्यात संगणक वा तत्सम सुविधा खरेदी करण्याची किंवा सीडीवरचे सॉफ्टवेअर, पुस्तके वा संगीत जवळ बाळगण्याची कदाचित गरजच भसणार नाही. विशिष्ट सेवाशुल्क देऊन आपण क्लाउडमध्ये मिळणारी सर्व पूरक साधने आणि उपकरणे वापरू शकू. कोणत्याही लॅपटॉप वा हँडसेटमार्फत आपण महाजालात 'ठेवलेल्या' आपल्या वस्तूंपर्यंत 'पोहोचू' शकू

# अमराठी वाहनचालकांसाठी मराठी संवाद अनिवार्य प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष बैठक

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील रिक्षा, टॅक्सी तसेच ओला ,ऊबर इ–बाईक टॅक्सी सारख्या इतर व्यावसायिक अमराठी वाहनचालकांनी प्रवाशांशी मराठीतून संवाद साधणे अनिवार्य करण्याच्या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने ठोस पावले उचलली आहेत. या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ, साहित्यिक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत विशेष बैठक आयोजित केली आहे.

शासनाने २०१९ मध्ये घेतलेल्या निर्णयानंतरही अनेक ठिकाणी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. विशेषतः परप्रांतीय वाहनचालकांकडून प्रवाशांशी मराठीत संवाद साधला जात नसल्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. याच पार्श्वभूमीवर हा विषय गांभीर्याने घेत राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे.अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रालयात पत्रकार कक्षात दिली.ज्येष्ठ पत्रकार




योगेश त्रिवेदी यांना स्मार्ट कार्ड चे वाटप एसटी महामंडळाचा शुभेच्छा दूत सिनेअभिनेते रितेश देशमुख यांच्या हस्ते देण्यात आले.त्या प्रसंगी मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली.

मराठी भाषेला नुकताच 'अभिजात भाषा' दर्जा मिळाल्याने या उपक्रमाला अधिक महत्त्व प्राप्त झाले असून, हा निर्णय केवळ प्रशासकीय न राहता अमराठी वाहनचालकांमध्ये मराठी भाषेबद्दल आत्मीयता निर्माण करणारा ठरावा, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

या उपक्रमांतर्गत अमराठी वाहनचालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रम तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. मुंबई मराठी साहित्य संघाच्या अध्यक्षा श्रीमती उज्ज्वला मेहेंदळे तसेच ज्येष्ठ साहित्यिक प्रदीप ढवण, महेश केळुसकर, संतोष राणे, अशोक बागवे, बाळ कांदळकर, सुनील तांबे, शिवाजी गावडे, सतीश सोळांकुरकर, अरुण म्हात्रे, एकनाथ आव्हाड, प्रसाद कुलकर्णी, प्राचार्य अशोक चिटणीस, ज्येष्ठ साहित्यिका अनुपमा उजगरे, दीपा ठाणेकर आणि मनीषा राजपूत आदींच्या मार्गदर्शनामुळे या मोहिमेला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या विषयावर सखोल चर्चा करण्यासाठी परिवहन आयुक्तही उपस्थित राहणार आहेत. उद्या, दि. २३ एप्रिल रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ११.०० वाजता ही बैठक होणार आहे. या बैठकीत मराठी भाषेची अनिवार्यता, अंमलबजावणीची रूपरेषा आणि प्रशिक्षणाचा आराखडा यावर व्यापक चर्चा होणार आहे.वाहनचालक आणि प्रवाशांमधील संवाद सुलभ करण्यासोबतच मराठी भाषेचा सन्मान राखण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केले आहे.

# नवीन पनवेलमध्ये अतिक्रमणा विरोधातील कारवाईत भेदभावाचे आरोप; नागरिकांमध्ये संताप

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

नवीन पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील सेक्टर १७ मधील मंगलमूर्ती रोज बाजार भूखंडावर बेकायदेशीर टपऱ्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून शहरभर कारवाई सुरू असताना या भागात मात्र भेदभाव होत असल्याचे आरोप स्थानिक नागरिकांनी केले आहेत.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित टपरीधारकांकडे महापालिकेचा कोणताही वैध व्यवसाय परवाना नसतानाही येथे मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांची विक्री सुरू आहे. सायंकाळच्या वेळेत या टपऱ्यांचा विस्तार होत फूटपाथवरही स्टॉल्स लावले जातात. काही प्रकरणांमध्ये हे स्टॉल्स भाड्याने दिले जात असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

फूटपाथवर अतिक्रमण झाल्यामुळे पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय, रात्रीच्या वेळी येथील सांडपाणी व कचरा आजूबाजूच्या गटारांमध्ये टाकला जात असल्याने परिसरात अस्वच्छता वाढत आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, या टपरीधारकांवर राजकीय वरदहस्त असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नाही. अतिक्रमण विभागाची गाडी परिसरात आल्यावर काही वेळासाठी फूटपाथ मोकळा केला जातो, मात्र पथक निघून गेल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण केले जाते.




याशिवाय, या मार्केटमधून महापालिकेतील काही अधिकाऱ्यांना हप्ते दिले जात असल्याच्या चर्चाही स्थानिकांमध्ये सुरू आहेत. अनेक वेळा तक्रारी करूनही महापालिका प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, प्रशासन 'धृतराष्ट्राची भूमिका' घेत असल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून निष्पक्ष कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पनवेलमध्ये 'युवा शक्ती जागर' यात्रेला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; कृष्णराज महाडिक यांचा कार्यकर्त्यांशी थेट संवाद

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित 'युवा शक्ती जागर' यात्रेच्या निमित्ताने पनवेलमध्ये तरुणाईचा महाकुंभ पाहायला मिळाला. या यात्रेचे नेतृत्व करत असलेले भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी पनवेलमधील मार्केटयार्ड येथील बैठकीत बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर आणि परिवाराच्या कार्याचा गौरव केला. ठाकूर परिवाराने प्रगत आणि पावन केलेली ही भूमी म्हणजे पनवेल आहे, अशा शब्दांत त्यांनी आपला आदर व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्यांनी अतिशय नम्र भूमिका घेत सांगितले की, मी आज प्रदेशाध्यक्ष असलो तरी तुमच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करणार आहे. मला तुमच्याकडूनही खूप काही शिकायचे आहे. आपण सर्वांनी मिळून युवा मोर्चाचे एक मजबूत संघटन उभे करूया. तरुणांनी विविध क्षेत्रांत काम करण्याचे धाडस दाखवले पाहिजे आणि मी तुमच्यासोबत प्रदेशाध्यक्ष म्हणून



नाही, तर एक मित्र म्हणून सदैव पाठीशी उभा राहीन. अशी ग्वाही त्यांनी दिली. मंगळवार २१ एप्रिल रोजी ही यात्रा पनवेलमध्ये दाखल झाली. यात्रेचे स्वागत गार्डन हॉटेलपासून काढण्यात आलेल्या एका भव्य बाईक रॅलीने करण्यात आले, ज्यामध्ये शेकडो तरुण उत्साहाने सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉल येथे भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा विशेष संवाद मेळावा पार पडला, ज्यामध्ये आगामी काळातील संघटनात्मक बांधणीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या दौऱ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे वडाळे तलाव येथे आयोजित केलेला 'मीट–अप विथ के. एम.' हा कार्यक्रम. या विशेष सत्रात कृष्णराज महाडिक यांनी तरुण पिढी आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्ससोबत थेट संवाद साधला, ज्यामुळे तरुणांमध्ये एक वेगळीच ऊर्जा पाहायला मिळाली. संपूर्ण जागर यात्रेच्या माध्यमातून युवकांना संघटित करून त्यांच्यामध्ये नवीन राजकीय आणि सामाजिक चेतना निर्माण करण्याचा प्रयत्न भारतीय जनता युवा मोर्चाकडून यशस्वीपणे करण्यात आला. या यात्रेला उत्तर रायगडमधील युवकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभल्याने पनवेलमध्ये भाजपची मोठी ताकद दिसून आली. या वेळी पनवेल महापालि'केचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक अजय बहिरा, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्च्याचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, शहर उपाध्यक्ष केदार भगत, अमित ओझे, तालुका सरचिटणीस विश्वजित पाटील, रोहित जगताप, युवा मोर्च्याचे नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष मयूर कदम, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष हिमेश बहिरा, निखील जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेल्वे अपघातात दोन्ही पाय हिरावले,पण जिद्दीने मातृत्व जिंकले

## खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दिला ३.२ किलोच्या वजनाच्या निरोगी बाळाला जन्म

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

अत्यंत दुर्मीळ आणि गुंतागुतीच्या अशी गर्भधारणा असलेल्या तसेच रेल्वे अपघातात दोन्ही पाय गमावलेल्या एका डॉक्टर महिलेने मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये ३.२ किलो वजनाच्या निरोगी बाळाला जन्म दिला. प्रगत वैद्यकीय उपचार आणि तज्ज्ञांच्या टीमवर्कमुळे आई आणि बाळ दोघेही सुरक्षित आहेत.धाडस आणि अत्याधुनिक वैद्यकीय सेवेच्या एक प्रेणादायी उदाहरण ठरले आहे. प्रसूती तज्ञ डॉ. स्वप्ना दहे, स्त्रीरोग तज्ञ डॉ. अनुरंजिता पल्लवी आणि डॉ. संतोष जयभाये यांच्या टीमने, गुंतागुंतीची गर्भधारणा यशस्वीरित्या हाताळली. रुग्ण डॉ. रोशन शेख, यांनी यापूर्वी एका भीषण रेल्वे अपघातात आपले दोन्ही पाय गमावले होते. यानंतर शारीरिक आणि भावनिक आव्हानांवर मात करत त्यांनी मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे ३.२ किलो वजनाच्या एका निरोगी बाळाल जन्म दिला.



डॉ. रोशन शेख यांचा मातृत्वाचा प्रवास संघर्षमय असूनही प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरत आहे. रेल्वे अपघातानंतर त्यांनी त्यांचे पुन्हा आयुष्य नव्याने उभे केले, कृत्रिम पायांच्या साहाय्याने चालु लागल्या आणि दैनंदिन आयुष्यातील कित्येक आव्हानांना धाडसाने सामोरे गेल्या. इतकंच नाही तर त्यांनी एमबीबीएस आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करत बांद्रा येथील गुरु नानक हॉस्पिटलमध्येही सेवा देण्यास सुरुवात केली. स्वतःच्या संघर्षाला त्यांनी इतरांसाठी प्रेरणादायी उदाहरण तयार केले.

डॉ. रोशन शेख म्हणाल्या, मी गर्भवती असल्याचं कळणं हा माझ्या आयुष्यातील अत्यंत भावनिक क्षण होता. अनेक संकटांनंतर मला हा दैवी आशीर्वाद वाटला आणि यामुळे माझ्या आयुष्याला नवे वळण मिळाले. मात्र त्याचवेळी आनंदसोबतच भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव जाणवत होता. त्यामुळे मी माझी मैत्रीण डॉ. स्वप्ना दहे हिच्याशी संपर्क साधला आणि तिथून पुढे माझा गर्भधारणेचा प्रवास मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये सुरू झाला.

खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटल स्त्रीरोग तज्ञ डॉ. अनुरंजिता पल्लवी म्हणाल्या, हे अत्यंत गुंतागुंतीचे प्रकरण होते. रुग्णाने दोन्ही पाय गमावल्याने कृत्रिम पायांच्या आधाराने शारीरक हालचाल करणे आणि गर्भधारणेचं व्यवस्थापन करणे अधिक आव्हानात्मक होतं.

प्रसूती तज्ञ डॉ. स्वप्ना दहे म्हणाल्या, संपूर्ण गर्भावस्थेत रुग्णाने अत्यंत सकारात्मकता आणि धैर्य दाखवले. नियमित तपासणी, योग्य औषधोपचार आणि वैद्यकिय सल्ल्याचं काटेकोर पालन करण्यात आलं. ॲनेस्थेशिया तज्ज्ञ, नवजात शिशु तज्ज्ञ, न्यूरोसर्जन यांची टीम सज्ज होती. आई आणि बाळाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नियोजित सिझेरियन करण्यात आलं आणि निरोगी बाळाचा जन्म झाला. हा क्षण आमच्यासाठीही अत्यंत भावनिक होता. प्रसूतीनंतर २–३ दिवसांतच रुग्णाला हालचाल सुरू करणं शक्य झालं, त्या पुढे म्हणाल्या, आई आणि बाळ दोघांनाही चार दिवसांनंतर घरी सोडण्यात आले. विशेष म्हणजे सिझेरियननंतरही फिजिओथेरपीच्या मदतीने त्या कृत्रिम पायांच्या साहाय्याने चालू शकल्या. याचून त्यांची जिद्द आणि दांडगा आत्मविश्वास दिसून येतो.

आपला आनंद व्यक्त करताना डॉ. रोशन शेख म्हणाल्या, हा माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण पण सुंदर प्रवास होता. दोन्ही पाय गमावल्यानंतर पुन्हा उभं राहणं आणि आई होणं हा प्रवास शब्दात मांडणं कठीण आहे. भीती होती, अनिश्चितता होती, पण मी आशा सोडली नाही. आज माझ्या मुलीला हातात घेतल्यानंतर हा सगळा संघर्ष सार्थकी लागल्यासारखं वाटतं.

# लोणीत माणुसकी हरवली; जागेच्या वादातून महिलेचा अंत्यविधी रोखला

## हद्द निश्चितीसाठी ओबीसी समाजाचे तहसीलदारांना साकडे; दोन समाजांतील वादामुळे गावच्या सलोख्याला तडा

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

एकीकडे आपण विज्ञानाच्या गप्पा मारतो, मात्र दुसरीकडे हक्काच्या जमिनीसाठी मृताच्या अंत्यविधीतही अडथळे आणले जात असल्याचा संतापजनक प्रकार देगलूर तालुक्यातील लोणी येथे घडला आहे. स्मशानभूमीच्या जागेवरून ओबीसी आणि एसटी समाजात जुंपलेल्या वादामुळे एका वृद्धेचा अंत्यविधी अडवण्यात आला. या दुर्दैवी प्रकारामुळे गावात प्रचंड तणाव निर्माण झाला असून, अखेर प्रशासनाच्या दारी धाव घेत ही कोंडी फोडण्याची मागणी करण्यात आली आहे.

लोणी येथील गट क्रमांक १८६ मधील ५ आर जमीन स्मशानभूमीसाठी आरक्षित आहे. वर्षानुवर्षे येथे सर्व समाजांचे अंत्यविधी पार पडतात. मात्र, ओबीसी समाजातील गिन्याबाई कोंडीबा कुंद्राळे यांचे निधन झाल्यानंतर, त्यांचा मृतदेह अंत्यविधीसाठी नेला असता एसटी समाजातील काही गटांनी ही जागा केवळ आमचीच असल्याचा दावा करत अडवणूक केली. ऐन दुःखाच्या प्रसंगी मृतदेहाची झालेली ही विटंबना पाहून उपस्थित हळहळले. अखेर वाद टाळण्यासाठी दुसऱ्या ठिकाणी अंत्यसंस्कार करावे लागले.या घटनेचे पडसाद गावात उमटले असून, भाजप ओबीसी सेलचे तालुका उपाध्यक्ष विजय किशवे यांच्या नेतृत्वाखाली १९ जणांच्या शिष्टमंडळाने देगलूर तहसीलदारांची भेट घेतली. मृताच्या आत्म्याला शांती मिळण्याऐवजी जागेच्या वादात अडकवणे ही मानवतेला काळिमा फासणारी घटना आहे, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

यामध्ये प्रामुख्याने खालील मागण्या आहेत
१. स्मशानभूमीच्या ५ आर जागेची तातडीने मोजणी करून हद्द निश्चित करावी.
२. भविष्यातील वाद टाळण्यासाठी या जागेचे दोन समान भाग करून दोन्ही समाजांना स्वतंत्र जागा नेमून द्यावी.
३. सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्या प्रवृत्तींवर आळा घालावा.

गेल्या अनेक वर्षांपासून येथे सर्वजण अंत्यसंस्कार करत आहेत, मग अचानक हा दावा का? प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप करून हद्दी निश्चित केल्या नाहीत, तर हा वाद अधिक चिघळण्याची भीती आहे. आम्हाला न्याय हवा.
– विजय किशवे, तालुका उपाध्यक्ष, भाजप ओबीसी सेल.

आता चेंडू तहसील प्रशासनाच्या कोर्टात असून, प्रशासन यावर काय तोडगा काढते आणि लोणी गावातील शांतता कशी टिकवते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




# कानडी रोड कामातील त्रुटींमुळे नागरिकांचे जीवन धोक्यात; नगरोत्थान योजनेतील कामावर प्रश्नचिन्ह

## संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष की ठेकेदाराला पाठीशी घालण्याचा प्रयत्न? संविधान एकता युवा मंच आंदोलनाच्या पवित्र्यात

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील कानडी रोडचे काम नगरोत्थान योजने अंतर्गत पूर्ण करण्यात आले असले तरी या कामात अनेक गंभीर त्रुटी आढळून येत आहेत.विशेषतः प्रशांत नगर परिसरात रस्त्या वरून जाणाऱ्या मोठ्या नाल्यावर कोणताही संरक्षणात्मक कठडा बांधण्यात आलेला नाही. यामुळे नागरिक,पादचारी तसेच वाहन चालकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.या मार्गावर जवळच मोठी शाळा असून सतत रहदारी असते.पुढे अनेक गावांकडे जाणारा हा मुख्य रस्ता असल्याने येथे दिवसभर वर्दळ असते.मात्र नाल्यावर कठडा नसल्यामुळे विशेषतः रात्रीच्या वेळी




अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.
या गंभीर बाबीकडे सार्वजनिक बांधकाम विभाग व नगर परिषद केज यांच्या संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष कसे झाले,असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.तसेच संबंधित ठेकेदार कंपनीला लाभ मिळावा म्हणून जाणूनबुजून या त्रुटीकडे दुर्लक्ष केले जात आहे का,अशीही चर्चा सुरू आहे.दरम्यान, कानडी रोडवरील कामातील त्रुटी तात्काळ दूर करून काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात यावे,या मागणीसाठी संविधान एकता युवा मंच,कानडी रोड केज लवकरच आंदोलन छेडणार असल्याची माहिती समोर येत आहे.

# मागण्या मान्य करा अन्यथा २७ एप्रिलपासून बेमुदत बंद! कृषी विक्रेत्यांचा इशारा

**दैनिक वादळ वार्ता**
**पाथर्डी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कृषी सेवा केंद्र चालकांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धडक दिली आहे. शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास २७ एप्रिल २०२६ पासून बेमुदत बंद आंदोलन छेडण्याचा इशारा देत तहसीलदार व आमदारांना निवेदन सादर करण्यात आले. अहिल्यानगर फर्टीलायझर चे जिल्हाध्यक्ष
जिल्हाध्यक्ष मा. सतीश शेठ मुनोत, तालुकाध्यक्ष दिलीप शेठ रोकडे, उद्योजक राहुल शेठ कारखिले, उद्योजक महादेव शेठ दराडे, राहुल शेठ दरंदले, जवाहरलाल मंडलेचा, नितीन शिरसाट आदींसह तालुक्यातील सर्व कृषी विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.
यावेळी मा. तहसीलदार उद्धव नाईक साहेब , कृषी अधिकारी लोंढे साहेब यांना निवेदन देऊन विक्रेत्यांनी आपल्या प्रमुख मागण्या




मांडल्या. यामध्ये परवाना नूतनीकरण प्रक्रिया सुलभ करणे, ऑनलाईन पोर्टलमधील तांत्रिक अडचणी दूर करणे, खत-बियाणे व कीटकनाशक विक्रीवरील निर्बंध शिथिल करणे, बनावट व निकृष्ट दर्जाच्या औषधांवर कठोर कारवाई करणे, विक्रेत्यांकडून घेतलेली अनामत रक्कम परत करणे, तसेच तपासणी अधिकाऱ्यांची संख्या वाढवणे आदी मागण्यांचा समावेश आहे.तसेच खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर युरिया व डीएपी खतांचे नियोजनबद्ध वितरण करावे, थेट कंपन्यांकडून होणाऱ्या विक्रीमुळे स्थानिक विक्रेत्यांचे नुकसान थांबवावे, अशाही ठोस मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.
याचवेळी कृषी अधिकारी तसेच मा. आमदार मोनिकाताई राजळे यांनाही संपाबाबत व मागण्यांबाबत निवेदन सादर करण्यात आले. शासनाने आठ दिवसांत सकारात्मक निर्णय न घेतल्यास तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्रे २७, एप्रिलपासून बेमुदत बंद ठेवण्यात येतील, असा इशारा देण्यात आला आहे.या आंदोलनामुळे शेती हंगामाच्या तोंडावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असून प्रशासनाने तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी विक्रेत्यांकडून करण्यात येत आहे.

# गाण्यावर बंदी नाही, तर गुन्हा नोंद कसा?

## हिडमा गाण्यावर नृत्य,करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुन्हे प्रकरणी आजाद समाज पार्टी तर्फे निवेदन

# गडचिरोलीतील विद्यार्थ्यांवर पुण्यात लावलेले गुन्हे तात्काळ रद्द करा अन्यथा आंदोलन करणार

**दैनिक वादळ वार्ता**
**गडचिरोली । प्रतिनिधी**

विश्रांतवाडी येथील समाजकल्याण वस्तीगृहात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात आदिवासी संस्कृतीचे सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल करणे ही अत्यंत अन्यायकारक, असंवेदनशील आणि दडपशाहीची कारवाई आहे, असा तीव्र निषेध आजाद समाज पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात येत आहे. विशेष बाब म्हणजे ही मुले गडचिरोली जिल्ह्यातील रहिवासी असून सध्या पुण्यात ते समाजकल्याण वसतिगृहात उच्च शिक्षण घेण्यासाठी राहत असल्याची माहिती आहे. सदर कार्यक्रमात हिडमा या गाण्यावर नृत्य सादर केल्यामुळे गडचिरोली येथील किरण गोमासे व श्रीनिवास कुमरी या दोन निष्पाप विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे विद्यार्थी शिक्षण घेणारे असून त्यांचा कोणत्याही प्रकारच्या नक्षलवादी विचारसरणीशी संबंध नाही. केवळ आदिवासी संस्कृतीचे प्रदर्शन केल्याबद्दल त्यांना गुन्हेगार ठरवणे हे संविधानिक मूल्यांना हरताळ फासणारे आहे.शासनाने पाहिजे तर गाण्यावर बंदी घालायला पाहिजे. धेर्रीलिश वर हे गाणे सहज उपलब्ध असून शासनाने गाणे निर्माण करणाऱ्यावर, स्टुडिओ वर आणि नेट वर उपलब्ध करणाऱ्यावर अद्याप कोणतीही कारवाई केली नाही. जर संबंधित गाण्यावर कोणतीही अधिकृत बंदी नाही, तर त्या गाण्यावर नृत्य केल्याबद्दल विद्यार्थ्यांवर कारवाई करणे हे कायद्याचा चुकीचा वापर आहे, तर्कसंगत व न्यायसंगत नाही. ही कारवाई विद्यार्थ्यांच्या भविष्यावर घाला घालणारी असून त्यांच्या शैक्षणिक आणि मानसिक आयुष्यावर गंभीर परिणाम करणारी आहे.आजाद समाज पक्ष प्रशासनाला स्पष्ट इशारा देत आहे की, या प्रकरणाची तात्काळ आणि निष्पक्ष चौकशी करून संबंधित विद्यार्थ्यांवर दाखल केलेला गुन्हा त्वरित मागे घ्यावा. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, याची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी.

**न्याय, समता आणि संविधानिक अधिकारांचे संरक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांवर अन्याय सहन केला जाणार नाही.**
**राज बन्सोड, जिल्हाध्यक्ष. आजाद समाज पक्ष गडचिरोली**




# गोकुंदा येथील सु–संस्कार निवासी मतीमंद विद्यालयात विधी सेवा समितीचे कायदेविषयक शिबिर उत्साहात

**दैनिक वादळ वार्ता**
**किनवट । प्रतिनिधी**

तालुका विधी सेवा समिती, किनवटच्या वतीने गोकुंदा (ता. किनवट) येथील सु-संस्कार निवासी मतिमंद विद्यालयात नुकतेच कायदेविषयक जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरातून विद्यार्थी व पालकांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न करण्यात आला.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश पी. एम. माने हे होते. यावेळी वकील संघाचे उपाध्यक्ष टी. आर. चव्हाण यांच्यासह सदस्य डी. जी. काळे, पी. पी. गावंडे, विलास शामीले, दिपा सोनकांबळे, पी. जी. घुले आणि बी. बी. कानींदे (सर्व वकील)उपस्थित होते.
शिबिरात अँड. दिपा सोनकांबळे यांनी




विद्यार्थ्यांना व पालकांना विविध कायदे, हक्क आणि शासकीय सुविधा याबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. विशेषतः दिव्यांग विद्यार्थ्यांचे हक्क, शिक्षण व संरक्षण यावर त्यांनी प्रकाश टाकला.
यावेळी विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करण्यात आले, तर उपस्थित पालकांसाठी मिष्ठान्न भोजनाची व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.
या शिबिराच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. वायकुळे यांच्यासह श्री . शिंदे , श्री.डहाके , श्री .अस्वले यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांना शिक्षकेत्तर कर्मचारी श्रीमती जाधव, श्री. मनोहरे, श्री. ढगे, श्री. आईटवार, श्री. अमृते, श्री. बिरादार, श्री. कदम आणि श्री. पांढरे यांनीही सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. तोडकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक श्री. वायकुळे यांनी मानले.

## पनवेल तालुक्यात मनसेच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

# नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सर्वच स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष श्री राज साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार तसेच रायगड जिल्हा संपर्क अध्यक्ष संदिप देशपांडे व योगेश परुळेकर यांच्या मार्गदर्शना नुसार संदेश भाई ठाकूर रायगड जिल्हा अध्यक्ष व सुजित सोनवणे पनवेल तालुका अध्यक्ष, अल्पेश कडु तसेच राहुल पाटील यांच्या उपस्थितीत पनवेल तालुक्यात नविन पदनियुक्त्या करण्यात आल्या. निर्दोष केशव गोंधळी पनवेल तालुका सचिव, आकाश श्रीकांत देशमुख उलवे शहर अध्यक्ष, तुषार सुनील म्हात्रे गव्हाण विभाग अध्यक्ष , अमित



विनायक पाटील उलवे शहर उपाध्यक्ष, राजेश शंकर परमेश्वर उलवे शहर सचिव , नितिन कीसन तळेकर उलवे शहर सचिव, बाळकृष्ण जगन्नाथ पाटील गव्हाण विभाग उपाध्यक्ष तसेच प्रितम पंढरीनाथ तांडेल गव्हाण विभाग उपाध्यक्ष या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हेच परिवर्तनाची प्रेरणा-प्रा.नितीन बानगुडे

## केजमध्ये जय भीम महोत्सव उत्साहात; रिपाइंचे तालुकाध्यक्ष दिपक कांबळे यांचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे समाजाचा खरा उद्धार झाला. त्यांनी एक पाऊल पुढे टाकले म्हणून समाज प्रगतीच्या मार्गावर आला. मात्र समाज व्यवस्थेत प्रश्न विचारणाऱ्यांची संख्या वाढली पाहिजे, त्याशिवाय परिवर्तन शक्य नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हेच त्या परिवर्तनाची प्रेरणा आहेत, असे प्रतिपादन व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे पाटील यांनी केले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दिपक कांबळे युवा मंचच्यावतीने केज येथे आयोजित 'जय भीम महोत्सवा'त प्रबोधनपर वातावरणात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन केजचे मा.सभापती विष्णू घुले यांच्या हस्ते झाले. व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते प्रा. हनुमंत




भोसले, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे, शेकापचे राज्य समिती सदस्य भाई मोहन गुंड, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राहुल खोडसे, प्रा.हनुमंत सौदागर, भाजप युवा मोर्चा तालुकाध्यक्ष राहुल गदळे, शेषेराव कसबे, पत्रकार शुभम खाडे, भाजप युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष धनराज लाटे, माजी नगरसेवक कपिल मस्के, सरपंच महादेव जाधवर आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा.बानगुडे पाटील म्हणाले की, बाबासाहेबांनी अस्पृश्यतेच्या तीव्र झळा सहन करत शिक्षणाच्या बळावर जगात आपले स्थान निर्माण केले आणि ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बनले. पुस्तक माणसाला स्वाभिमान देते, विचार देतात आणि मस्तक कोणाचेही हस्तक होऊ देत नाही, असेही त्यांनी अधोरेखित केले. प्रा.बानगुडे यांनी बाबासाहेबांच्या जीवनातील रामजी बाबांचे योगदान, राजर्षी शाहू महाराजांची दूरदृष्टी तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरही बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव अधोरेखित केला. तुम्ही सुरुवात करा, बाबासाहेबांच्या विचारांचा प्रकाश तुम्हाला ध्येयापर्यंत पोहोचवेल, असेही प्रा. बानगुडे पाटील यांनी म्हटले.

### विष्णू घुले, प्रा.हनुमंत भोसलेंकडून आयोजकांचे कौतुक

**उद्घाटक विष्णू घुले यांनी आपल्या मनोगतात दिपक कांबळे युवा मंचाच्या उपक्रमाचे कौतुक करत सांगितले की, अशा प्रबोधनात्मक कार्यक्रमांमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचतात.**

**प्रा. हनुमंत भोसले यांनीही मनोगत व्यक्त केले. तसेच, त्यांनी आयोजकांच्या नियोजनाबद्दल कौतुक केले.**

# कष्टातून यशाचे शिखर: माजलगावच्या भोई समाजातील पहिली महिला डॉक्टर स्वाती भुजंगे

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर कोणत्याही संकटावर मात करता येते, हे माजलगाव येथील डॉ.स्वाती राजाभाऊ भुजंगे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. मराठवाड्यातील भोई समाजातून एम.बी.बी.एस. (MBBS) पूर्ण करणाऱ्या त्या पहिल्या महिला विद्यार्थिनी ठरल्या आहेत. त्यांच्या या यशाने संपूर्ण जिल्ह्यातून त्यांचे कौतुक होत आहे.

डॉ.स्वाती यांचे वडील, राजाभाऊ भुजंगे, व्यवसायाने मच्छीमारी व वीट भट्टी कामगार आहेत. अत्यंत सामान्य आर्थिक परिस्थिती असतानाही त्यांनी आपल्या मुलींच्या शिक्षणात कोणतीही कमतरता भासू दिली नाही. स्वतः उन्हात-पाण्यात मेहनत करून त्यांनी मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. एका मच्छीमार वडिलांच्या कष्टाचे चीज करत स्वाती यांनी वैद्यकीय क्षेत्रात हे



दैदीप्यमान यश संपादन केले आहे.

स्वाती यांनी आपले एम.बी.बी.एस.चे शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज येथून यशस्वीपणे पूर्ण केले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपला आत्मविश्वास ढळू दिला नाही. भोई समाजातील मुलींनी उच्च शिक्षणाकडे वळावे, यासाठी त्यांचे हे यश मैलाचा दगड ठरणार आहे.

मराठवाड्यातील भोई समाजाच्या वतीने डॉ.स्वाती भुजंगे यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे. समाजातील एका मुलीने डॉक्टर होणे, ही संपूर्ण समाजासाठी अभिमानाची गोष्ट आहे, अशा भावना समाजातील मान्यवरांनी व्यक्त केल्या आहेत.

डॉ.स्वाती भुजंगे यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील अनेक मुलींना शिक्षणाची नवी उमेद मिळाली आहे.

शिक्षण हेच प्रगतीचे साधन आहे, हे स्वाती यांनी दाखवून दिले आहे.

# बीड जिल्ह्यात आम्रमच्या देवगड हापूस व्यवसायाची भरभराट

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात आम्रमच्या देवगड हापूस आंब्याच्या व्यवसायाने गेल्या काही वर्षांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. विशेषतः अंबाजोगाई शहरात या व्यवसायाची मजबूत पायाभरणी झाली असून, स्थानिक प्रतिष्ठित नागरिकांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम मोठ्या प्रमाणात उभा राहिला आहे.

मागील सहा वर्षांच्या कालावधीत या व्यवसायाच्या वाढीसाठी अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले. तसेच ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी व त्यांना जोडण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले.

या उपक्रमात अंबाजोगाई शहराचे नगराध्यक्ष मा. श्री. नंदकिशोरजी मुंदडा, केज मार्केट कमिटीचे सभापती मा. श्री. अंकुशरावजी इंगळे, सौ. स्वरूपाताई कुलकर्णी, धनराजजी




सोळंकी, प्रेरणा ड्रेसेस परिवार, भास्कर भिसे, तळणीकर साहेब, फुलचंद भाऊ जाधव, भरतजी तोष्णीवाल, तसेच केज येथील प्रतिष्ठित नागरिक भैय्यासाहेब देशमुख आणि गिरीराज कलेक्शनचे मालक पिलाजी परिवार यांसह अनेकांनी मोलाचे सहकार्य केले.

या सर्वांच्या योगदानामुळे देवगड हापूस आंब्याची ओळख बीड जिल्ह्यात अधिक दृढ झाली असून, भविष्यातही या व्यवसायाचा विस्तार होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. संबंधितांनी सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले असून, पुढेही असेच सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# विठ्ठल रुक्मिणी प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्यानिमित्त विठ्ठल नामाने पाटोदा नगरी दुमदुमली

दैनिक वादळ वार्ता

**हानुमंत चंदनकर**

धर्माबाद तालुक्यातील भक्तांचे माहेरघर म्हणून ओळख असलेल्या पाटोदा थडी येथे आज दिनांक २३ एप्रिल रोजी सदगुरु चंद्रशेखर महाराज देगलूरकर, कानेराज बाबा पिंपळगाव,(महानुभाव परिषद नांदेड जिल्हाध्यक्ष) श्री श्री श्री १००८ अष्टकौशल्य सन्मानित महंत नारायण गिरी महाराज वडगुंफा माहूर, यांच्या शुभहस्ते व महाराष्ट्रातील साधुसंत महंत कीर्तनकार प्रवचनकार टाळकरी माळकरी ज्ञानवंत गुणवंत किर्तीवंत गुनिजन गायक वादक हार्मोनियम वादक पाटोदा थडी व पंचक्रोशीतील बायलेकी यांच्या प्रमुख उपस्थितीत भक्तिमय वातावरणात विठ्ठल रुक्मिणी मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा थाटामाटात



पार पडला यावेळी उपस्थित गुरुवर्यांचं गावकऱ्यांच्या वतीने सन्मान करण्यात आला दिनांक २२ एप्रिल रोजी सायंकाळी विठ्ठल रुक्मिणी पालखी सोहळा व कलशारोहण पालखी सोहळा विठ्ठल नामाच्या गजरात भव्य दिव्य गावभर मिरवणूक करण्यात आली होती यात महिलांनी आरत्या घेऊन सहभागी झाल्या होत्या भव्य महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# उत्तमनगर येथे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात

दैनिक वादळ वार्ता

**पुणे । प्रतिनिधी**

आज पुणे मनपा शाळा, उत्तमनगर येथे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहात व भावनिक वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवव्याख्याते साहित्यरत्न डॉ. गणेश विठ्ठल राऊत यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री. अमोल मिडगुले सर यांनी केले.

सुयोग्य नियोजनात झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शाळा व शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करत गौरवोद्गार काढले. आपल्या शालेय



जीवनातील गोड आठवणींना उजाळा देताना अनेक विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले.

यावेळी शाळेचे उपशिक्षक श्री. दिपक तांबे सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे, साहित्यरत्न डॉ. गणेश राऊत यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शंभुराजे आणि भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदर्श मानून जीवन घडवण्याचा मौलिक संदेश दिला. तसेच, आपल्या मातृभूमी व शाळेचे स्मरण सदैव ठेवावे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. कार्यक्रमप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा रागिनी जंगम, उपाध्यक्ष रंजना बनसोडे, शुभांगी शिंदे, सुमन कराडकर, उषा बडगे, पोर्णिमा माने ह सदस्य व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सिद्धेश्वर नागरगोजे यांनी केले, तर श्री. गोविंद लवांडे यांनी सर्वांचे आभार मानले.

# आ.संजय गायकवाड यांना अटक करुन आमदारकी रद्द करा-भारतीय कम्युनिस्ट पक्षाची मागणी

## कोल्हापूर स्थित पुस्तक वितरक प्रशांत आंबी यास परिवारासह जीवे मारण्याची धमकी दिली

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बुलढाणा जिल्ह्यातील आ.संजय गायकवाड यांनी कोल्हापूर स्थित पुस्तक वितरक प्रशांत आंबी यांना दूरध्वनीवरुन आई,बहिण,आणि पत्नीचा उल्लेख करुन, अतिशय अश्लील व अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन,घरात घुसून जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे त्यांचीचौकशी करुन अटक करावी आणि त्यांची आमदारकी सुद्धा रद्द करावी अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाने केली आहे.या संदर्भात महाराष्ट्र राज्याचे मा.राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांना आणि बीड जिल्ह्याचे मा. जिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवेदन पाठविण्यात आले आहे.

निवेदनामध्ये तीव्र निषेध नोंदवून म्हटले आहे की,

शिवाजी कोण होता हे पुस्तक ३८ वर्षांपुर्वी दिवंगत कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी लिहीले आहे.मराठी सहीत अन्य भाषांमधील लाखों प्रती वाचकांनी वाचलेल्या आहेत.मात्र,या पुस्तकाचे शिर्षक शिवाजी महाराजांचा एकेरी नावाने उल्लेख करीत असल्याचे म्हणत पुस्तकाचे वितरण,विक्री करीत असलेले प्रशांत आंबी यांना बेइज्जत करुन जीवे मारण्याची आमदाराने धमकी देणे म्हणजे चक्क गुंडगिरीच आहे.तद्वतच,या धमकी दरम्यान,या आमदाराने गोविंद पानसरे चे कसे हाल केले,तसेच तुझे सुद्धा करतो असे म्हटले आहे.यावरून,गोविंद पानसरे यांच्या खुनामध्ये या आमदाराचा देखिल सहभाग असावा,अशी रास्त शंका येते.करिता, त्या केस मध्ये सुद्धा यांना सहआरोपी करवून घ्यावे,रितसर चौकशी करावी.यापूर्वीही,सदर आमदाराने आमदार निवासातील कन्टीन मधील सामान्य कामगाराला शिवीगाळ करुन मारहाण केलेली आहे.कायदे मंडळाचा सदस्य असलेल्या व्यक्ती नेच कायदा पायदळी तुडविला असुन दहशत निर्माण केल्यामुळे या प्रकरणात चौकशी करुन

गुन्हा नोंदवावा,अटक करावी,त्यांची आमदारकीची पात्रता रद्द करावी,आणि प्रशांत आंबी व त्यांच्या कुटुंबीयांना योग्य सक्षम संरक्षण देण्यात यावे,या मागण्या करण्यात आल्या आहेत. निवेदनावर राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ.नामदेव चव्हाण,राज्य कौन्सिल सदस्य कॉ.भाऊ प्रभाळे, कॉ.ज्योतिराम हुरकुडे, प्राचार्य कॉ.राजकुमार कदम,किसान सभेचे अध्यक्ष प्राचार्य कॉ.डी जी तांदळे,कॉ.भिमराव चव्हाण वकील,कॉ. फिडेल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे,कॉ. रामदास कदम,अझहर शेख,कॉ.भिमराव जगताप,कॉ.यासीन शेख,कॉ.अजय हुन्बे, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077